

**फोटो सर्कलच्या कार्यालयाचे उद्घाटन करताना ज्येष्ठ छायाचित्रकार उद्धव ठाकरे सोबत महापौर शारदा राऊत, संस्थेचे अध्यक्ष नयन तांबोटकर, उपाध्यक्ष मनोज मुसळे, प्रवीण देशपांडे, नगरसेवक अनिल सावे व महिला आघाडी प्रमुख सौ. विमल मोरे दिसत आहेत. (छाया-अतुल मळेकर)**

# ज्येष्ठ वन्य छायाचित्रकार उद्धव ठाकरे यांच्या हस्ते फोटोसर्कल सोसायटीच्या कार्यालयाचे उद्घाटन

ठाणे दि. २३ - ठाण्यातील हौशी व व्यावसायिक छायाचित्रकारांची एक मान्यवर संस्था. छायाचित्रण हा विषय घेऊन एक चळवळ उभी करण्याचा संस्थेचा गेली सहा वर्षे प्रयत्न सुरू आहे आणि बऱ्याच अंशी संस्था यशस्वीही झाली आहे.

अनेक प्रकारच्या कार्यशाळा, स्पर्धा, चर्चासत्रे, ठाणे-मुंबईतील मान्यवर छायाचित्रकारांची व्याख्याने आयोजित करणे, सामाजिक बांधिलकी या नात्याने विविध शाळांतील विद्यार्थ्यांसाठी **छायाचित्रणाची** प्राथमिक माहिती तसेच प्रिंटिंग तंत्रज्ञानाची ओळख या संदर्भात व्याख्याने आयोजित करणे व ठाण्यातील सर्व नागरिक अतिशय उत्कंठेने वाट पाहातात असे दिवाळीतील छायाचित्र प्रदर्शन व स्पर्धा. ठाणे महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा गेली पाच वर्षे यशस्वीरित्या पार पाडली जाते. साधारणपणे ३५ ते ४५ हजार नागरिक या प्रदर्शनाचा आस्वाद घेतात.

२००१ साली तत्कालीन आयुक्त टी. चंद्रशेखर यांनी ठाण्याचा चेहरामोहरा बदलला. सदर बदललेल्या ठाण्याचे दिनदर्शिकेच्या रुपात नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे काम ना नफा ना तोटा तत्त्वावर संस्थेने केले होते.

ठाण्यात सुसज्ज कलादालन असावे अशी मागणी गेली सहा वर्षे फोटो सर्कल सोसायटीने केली आणि त्याचा पाठपुरावा देखील सातत्याने केला. फोटोसर्कलचे कार्यालय आणि ठाण्यातील कलादालनचे भूमीपूजन हे एकाच दिवशी व्हावे हा दुग्धशर्करा योगच.

अशा या संस्थेचे स्वत:चे कार्यालय असणे ही एक अभिमानास्पद गोष्ट आहे. ज्येष्ठ वन्य छायाचित्रकार उद्धव ठाकरे यांनी सदर संस्थेच्या दादोजी कोंडदेव येथील कार्यालयाचे उद्घाटन केले.

सदर प्रसंगी खासदार सतीश प्रधान, महापौर सौ. शारदा राऊत, महिला आघाडी प्रमुख विमल मोरे, नगरसेविका ॲड. माधवी नाईक, अनिल सावे, राजेंद्र साप्ते, ठाणे भारत सहकारीचे एम. वाय. गोखले, मधु गडकरी, चित्रकार विजयराज बोधनकर व ठाणे जिल्ह्यातील अनेक छायाचित्रकार उपस्थित होते.

## सीट तर्फे आज मोर्चा

सरकार मात्र सत्तेला चिकटून राहण्यासाठी लोकांवर खर्चाचा बोजा टाकणाऱ्या वेगवेगळ्या निवडणुका घेण्याचे नाटक करीत असल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला.

(पान ३ पहा)

बाजीर
पाडली
रवि
ठाण्या
जकात
असता
गाडी



*ठाणे महापौर चषक अखिल भारती समारंभास उपस्थित शिवसेनेचे कार्या देऊन त्यांचे स्वागत करतांना स्पर्धेचे अ यावेळी महापौर सौ. शारदा राऊत, आमदार सिताराम भोईर, कबड्डी महर्ष*

# शिवशव रिपब्लिकन

कल्याण दि. २३ - शिवसेना नेते उद्धव ठाकरे यांच्या हाकेला प्रतिसाद राष्ट्रीय रिपब्लिकन पक्षाने दिल्यामुळे शिवशक्ती-भिमशक्ती युतीचा पुकार केला आहे. त्यास महाराष्ट्रामध्ये मोठा पाठिंबा मिळत आहे. येत्या निवडणुकीमध्ये शिवशक्ती-भिमशक्तीचे सरकार सत्तेवर येईल असे राष्ट्ररिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष तानसेन ननावरे यांनी भाकीत केले आहे.

रिपब्लिकन जनतेचा खऱ्या अर्थाने विकास करण्यासाठी शिवशक्ती-भिमशक्तीच्या संकल्पनेतून कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रातही रिपब्लिकन नगरसेवक महादेव रायभोळे यांच्या प्रमुख नेतृत्त्वाखाली राष्ट्रीय रिपब्लिकन पक्षाची स्थापना झाली आहे. माजी नगरसेविका



रा
कल्य
कार्य
रमेश
शहर